# ओवी नामामृत सार



ब्रह्मचैतन्य कृपा करिती ।
ओवीसार लिहिण्या मति देती ॥
सद्गुरु प्रभूस मिळे स्फूर्ति ।
देण्या भाविकां नामामृत ॥

—सद्गुरु प्रभु

प्रमुख विक्रेते : तुकाराम बुक डेपो, माधवबाग, मुंबई ४

संपादक–प्रकाशक :
गुं. फ. आजगांवकर,
१७ के. जी. बी. निवास,
गिरगांव, मुं. ४०० ००४.

प्रथमावृत्ती : विजयादशमी दि. १६ ऑक्टोबर ८३

किंमत १–५० रुपये

मुद्रक :
शरद कृष्णाजी सापळे,
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस,
३१, त्रिभुवन रोड,
मुंबई नं. ४०० ००४

# ओवी नामामृत सार



ब्रह्मचैतन्य कृपा करिती ।
ओवीसार लिहिण्या मति देती ।।
सद्गुरु प्रभूस मिळे स्फूर्ति ।
देण्या भाविकां नामामृत ।।

—सद्गुरु प्रभु

संपादक : गुं. फ. आजगांवकर, (संचालक प्रबोधन रिचर्स असोशिएट्स,
१७ के, जी. बी. निवास, मुंबई नं. ४०० ००४.

# प्रास्ताविक दोन शब्द !

**'सोऽहं ध्यान तरंग'** ह्या पुस्तकाच्या प्रकाशनाचे विचारवंताकडून चांगले स्वागत झाले. अनेकांनी उत्फूर्त पत्रें लिहून नित्यवाचनासाठी ह्या पुस्तकाचा चांगला उपयोग होत आहे असे कळविले आहे. **'ओवी नामामृत सार'** हे सद्गुरु प्रभूचे दुसरे पुस्तक! श्रीसमर्थ **सद्गुरु ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज यांच्या प्रवचनांतून** रामनामाचे महत्त्व विस्तारपूर्वक सांगितले आहे. महाराजांच्या वचनांचें सार भक्तजनांसाठी अगदी सोप्या भाषेंत यांत ओवीबद्ध केलें आहे.

रामनाम हा सिद्धमंत्र आहे. हा मंत्र माणसाला भगवंताप्रत नेतो. रामनाम हा देहबुद्धि जाळणारा अग्नि आहे. रामनाम हें ओंकाराचेंच स्वरूप आहे. तें सर्व कर्मांचा आणि साधनांचा प्राण आहे. श्री शंकरापासून तो समर्थांच्या पर्यंत जे जे महासिद्ध होऊन गेले त्या सर्वांनी रामनाम कंठी धारण केलें. भगवंत माझ्या हृदयात आहे अशी जाणीव मनामध्यें टिकण्यास भगवंताचें सतत चिंतन अवश्य आहे.

मायेच्या जाळ्यांतून बाहेर काढणारे नाम हे एकच साधन आहे.

**संत नामदेव म्हणतात—**

(१) सर्वकाळ वाचे म्हणा नारायण । वायां एक क्षण जावों नेदी ॥
नामा म्हणे सर्व सुखची होईल । मन हे ठेवाल हरी पायी ॥

(२) देह जावो अथवा राहो । पांडुरंगी माझा भावो ॥

(३) संग सज्जनाचा । उच्चार नामाचा । घोष कीर्तनाचा अहर्निशी ॥

**तुकाराम महाराज म्हणतात—**

(१) नामाच्या चिंतनें । बारा वाटा पळतीं विघ्नें ॥
तुका म्हणे प्राण । करा देवासी अर्पण ॥

(२) घेई घेई माझे वाचे । गोड नाम विठोबाचें ॥
मना तेथें धांव घेई । राही विठोबाच्या पायीं ॥

नामस्मरणाने चित्तशुद्धि होते आणि आत्मोद्धार होतो अशी संतांची ग्वाही आहे.

—गुं. फ. आजगांवकर

★

# ओवी नामामृत सार



श्री गणेशायनमः

श्री सरस्वत्यै नमः

श्री सद्‌गुरवे नमः

नाम असे साध्यसाधन । जीवशिवाचें जीवन ।
वृत्ती भगवंताचें मिलन । नामस्मरणीं ॥ १ ॥

नामस्मरणीं अनुसंधान । घडोनी भेटती संतजन ।
सद्‌गुरु येती शोध घेऊन । वर्षाव करिती कृपेचा ॥ २ ॥

नाम घ्यावें संतत । जंव असे स्मृती सोबत ।
समाधान मिळेपर्यंत । श्वासासम घडावें ॥ ३ ॥

महत्त्व नाहीं बैठकीला । तें असे नामसातत्याला ।
योग्य दिशा प्रगतीला । नामधारका तें नेतें ॥ ४ ॥



स्मरण ऐकतां एकाग्रता । नामस्मरणें येते चित्ता ।
सर्वांभूतीं भगवंत देखतां । सहज एकाग्रता घडे ॥ ५ ॥

रुपा आधीं आणि नंतर । नाम असतें निरंतर ।
नामांत रूप सुक्ष्मतर । इच्छेनुसार भगवंताचें ॥ ६ ॥

नामामागून प्रेम येतें । नामप्रेम एकत्र नांदतें ।
कळकळीनें प्रेमाभरतें । निश्चित येतें नामस्मरणीं ॥ ७ ॥

नामें अंतःकरणाची शुद्धता । भगवंत प्रेम सहज ये हाता ।
नाम सहवास वाढतां । नाम प्रेम वाढेल ॥ ८ ॥

नाम घेतल्याने सतत । विकल्प कमी होतात ।
नाम सोडूं नये खचित । विकल्प उच्चाटन होतसे ॥ ९ ॥

माता कामधंदा करी । परी चित्त मुलावरी ।
प्रपंचीं लक्ष नामावरी । उत्तम परमार्थ लक्षण ॥ १० ॥

राम नामस्मरण सातत्यानें । स्वतःस घडतें विसरणें ।
सुक्ष्मापलिकडे होते जाणें । म्हणून जपावें नामास ॥ ११ ॥

देवा हातीं आपुलें जीवन । देव नामाच्या स्वाधीन ।
सिद्धसाधकाचें साधन । भगवत् नाम निष्ठेचे ॥ १२ ॥

नामांत जाणें रंगून । एकांतांत त्याचे पर्यावसान ।
देहबुद्धीचा मी विरोन । नामें सत्कर्म होत असे ॥ १३ ॥



नामा सोबत सत्कर्म येते । कर्म चक्रांना ते गती देतें ।
त्या आड काही न येतें । शंका निरसन नाम करील ॥१४॥

नाम, संत, भगवंत । नांदती शुद्ध जाणीवेंत ।
शोधार्थ न फिरावें लागत । जाणीवेप्रत नाम नेतें ॥ १५ ॥

नाम सकाम नसावें । निष्काम स्वरूप असावें ।
नामधारक आत्मज्ञाना पावे । निष्काम नामस्मरणें ॥ १६ ॥

नामस्मरणांत नवविधा भक्ती । आवडीनें भावें समाविष्ट होती ।
उपाधिरहित अभ्यासा गती । नामस्मरण वर्म असे ॥ १७ ॥

भगवंत नामें जगावें । रक्षिता तो एक मानावें ।
भगवंत नाम घेतो समजावे । जसें गंगाजल गंगार्पण ॥ १८ ॥

नामांत जगणें पराभक्ती । प्रेम बने पराशक्ती ।
प्रारब्धाची नाही क्षिती । देहबुद्धी उरेची ना ॥ १९ ॥

नाम शिका भगवंताचा । निश्चित काम होण्याचा ।
प्रारब्ध संबंध उरे देहाचा । देहा अलग मी असे ॥ २० ॥

लागल्यानें नाम छंद । निर्माण होतो प्रकाश आनंद ।
मुखीं निरंतर नामकंद । नामानुभव तोच असे ॥ २१ ॥

नाम असे स्वतः सिद्ध । तसेच अत्यंत उपाधिरहित ।
तेणे गुरू समीप शरणागत । नामधारक होत असे ॥ २२ ॥



सदाचरण शुद्ध अंतःकरण । संत आशीर्वाद नामस्मरण ।
भगवंत कृपा तेणेंच जाण । चित्तशुद्धीनुसार ती ।। २३ ।।

देह राहील प्रारब्धावर । भगवंत स्मरणी मन स्थीर ।
कर्तव्यजागृतीं परमेश्वर । नामसाधन तेंच असे ।। २४ ।।

अनुसंधाने अभ्यासपूर्ण । आपैपें वाढती सर्व गुण ।
प्राप्त स्थितींत समाधान । अखंड नाम देतसे ।। २५ ।।

प्रपंच देवाचा मानणें । खुणा परमार्थाची जाणणें ।
प्रपंची अभिमान सोडणें । स्मरतें अंती नामरूप ।। २६ ।।

सर्वांभूतीं परमेश्वर । पाहणें उपासना निर्गूणथोर ।
या राजमार्गी परमेश्वर । आनंदरूपीं उभा असे ।। २७ ।।

नाम साधन अभिमान । मी कर्ता ओझें जाण ।
गुरुचरणीं करोनी अर्पण । सत्‌चिदानंदा पावावें ।। २८ ।।

प्रेम आहे आपुलकींत । आपुला मानावा भगवंत ।
दृढ भाव नेई यशाप्रत । प्रपंची तथा परमार्थी ।। २९ ।।

नाम तेथे परमात्मा । नाम तेथे शिवात्मा ।
नाम तेथे विश्वात्मा । सद्‌चिदानंद नाम असे ।। ३० ।।

नाम अवतार भगवंताचा । सुष्टाना मुक्त करण्याचा ।
सुक्ष्म वासना नाशाचा । नाम उत्तम मार्ग असे ।। ३१ ।।



भगवंताचे नामस्मरण । देबुद्धीचे ठरते मरण ।
सत्य कळण्यासाठी 'मी कोण' । नामस्मरण जरूरीचे ॥३२॥

नामरुपी जाळ्यांत । अडके सहज भगवंत ।
सद्बुद्धी भगवंत नामांत । नाम महात्म्य अनंत असे ॥३३॥

परमार्थी जो खरा असे । आत्मपरिक्षणीं तो नित्य हासे ।
रास दुर्गुणांची नामें दिसे । हाच खरा परमार्थ ॥ ३४ ॥

असुचा जन्म वासनेत । वासनाक्षय रामनामांत ।
शरणांगति येण्या नामें मदत । मानवजन्मी होत असे ॥३५॥

कळकळीचे नामस्मरण । भगवंता पोचते निश्चित जाण ।
भगवंत चरणी समाधान । नामधारका मिळेल ॥ ३६ ॥

नामस्मरणे शरणांगती । शरणांगतीनें भगवत् प्राप्ती ।
कर्तृत्व परमेशाचे ऐसी मती । देहबुद्धी नष्ट करी ॥ ३७ ॥

नीतिधर्म कर्तव्याने । नेमे रहावे नामधारकाने ।
प्रपंच परमात्मरूप झाल्यानें । आहे सार्थक जन्माचे ॥ ३८ ॥

जो भगवंताचा दास । दास बोध होतो त्यास ।
अखंड नामस्मरण सहवास । जगदोद्धार होण्याला ॥ ३९ ॥

रोज थोडे वाचन । तदनंतर व्हावें नमन ।
नमनानंतर आचरण । नित्य नेम हाच असे ॥ ४० ॥



स्वार्थरहित रामसेवा । याहून लाभ नाही जीवा ।
कायेनें भगवंत सेवा । चित्ती ध्यानीं भगवंत ॥ ४१ ॥

सर्व विश्व असे माया । तीच असे परमेश्वर छाया ।
माया ओलांडून मैल जाया । नामस्मरण रामबाण ॥ ४२ ॥

होते, आहे, राहील नाम । असणेपणाचा त्याचा गुण ।
ॐकारांतून सृष्टी उगम । नाम असे सत्स्वरूप ॥ ४३ ॥

त्रिकालाबाधित असे नाम । न संपे महात्म्य सांगून ।
सत्कर्मी त्याचे अधिष्ठान । नामें सुटे विषयासक्ती ॥ ४४ ॥

निष्ठेने जो घेतो नाम । बिनचूक होई त्याचे काम ।
आनंदरूपी आत्माराम । नामधारका अनन्य करी ॥ ४५ ॥

परमात्मा पहावा नामांत । नामधारकापाशी तो तिष्ठत ।
मागे पुढे तो उभा राहत । नामधारका संभाळी ॥ ४६ ॥

जो राहिला नामांत । तो नित्य असे सत्संगतींत ।
नामस्मरणीं संत संगत । नामधारका लीन ठेवी ॥ ४७ ॥

संतजनांचा सहवास । भावयुक्त करी आपणास ।
सर्वांभूती भगवत्भावास । नामस्मरण कारण ॥ ४८ ॥

दृढनिश्चय शुद्ध भाव । परमार्थी होई अमुल्य ठेव ।
तेणें मुळाचा मिळे ठाव । नाममूळ आत्मारामी ॥ ४९ ॥

उपाधियुक्त असती लोक । नामें होती निरुपाधिक ।
कोणत्याहि नामें दिली हाक । 'ओ' देई भगवंत ॥ ५० ॥




कर्तव्य आणि भगवंत । अनुसंधान ठेवावे दोघांत ।
भाव असावा चित्तांत । माझे सर्व रामाचे ।। ५१ ।।

गेल्याने शरण भगवंता । अभिमान गळे ‘ मी कर्ता ’ ।
नामस्मरणें निष्ठावान भक्ता । भगवंत होतां येईल ।। ५२ ।।

मना तळमळ भगवंताची । हेतुविण स्मरणाची ।
प्राप्त स्थितींत पाहण्याची । ईशवृत्ती पाहिजे ।। ५३ ।।

मऊ असावे लोण्यासमान । मी रामाचा असे मानून ।
त्याच्या स्मरणात राहून । घ्यावे नाम साधके ।। ५४ ।।

भगवंत कृपा भगवंत स्मरण । भगवंत नामी समाधान ।
सर्व रोगांवर रामबाण । औषध रामनामाचे ।। ५५ ।।

नामे कळती अवगुण । नामे कळे सगुण निर्गुण ।
प्रेमभावें वागून । जन प्रियत्व येईल ।। ५६ ।।

निघाली स्वारी भगवंताची । सोबत होते आनंद वृत्तीची ।
विपत्तींतही नामस्मरणाची । गरज आहे निःशंक ।। ५७ ।।

नाम असे अमृताहुनी गोड । येऊ नये कोणी घेण्या आड ।
नामस्मरणाची आवड । भाग्य लक्षण ते असे ।। ५८ ।।

प्रेम मागा नामाचे । भगवंतीं लीन होण्याचे ।
प्रारब्ध अहंता नाशाचे । कारण नामस्मरण असे ।। ५९ ।।

जोवरी असे श्वासोच्छ्वास । तोवरी घ्यावे नामास ।
सहाय्य करी तेंच खास । दुजे नसे साधन ।। ६० ।।

संसार असून दुःखाचा । लोकां वाटे सुखाचा ।
या रोगावर उपाय नामाचा । कथिला असे संतांनी ।। ६१ ।।

'मी कर्ता' भावना प्रपंचांत । निर्मिते फलाशा मानवांत ।
कर्तेपणा ठेवावा भगवंतांत । स्वयें नामीं रहावें ।। ६२ ।।

प्रपंच करावा युक्तीने । परमार्थ जोड द्यावी नामानें ।
आकुंचित प्रपंच करण्याने । तापदायक तो होतो ।। ६३ ।।

नामासह करावें कर्तव्य कर्म । समजून घ्यावे प्रपंचवर्म ।
प्रपंचांत साधावा मानवधर्म । प्रेमदया शांतीचा ।। ६४ ।।

प्रपंचांत स्मरावा राम । तेणें प्रपंच होई आराम ।
अहंतेला न मिळे काम । कर्ता करविता भगवंत ।। ६५ ।।

अंतकाळीं जैसी मति । तैसी मिळे त्याला गती ।
जन्ममृत्यु वासनी होती । वासना लय नामानें ।। ६६ ।।

थोडी चिकाटी प्रपंचांतील । भगवंतनामी जरी लागेल ।
आनंद साधन होईल । प्रपंचाचें ।। ६७ ।।

सर्व अनुभवात आत्मप्रचिती । आत्म प्रचितीने जागृति ।
साधना येई जोर गती । अन्यथा प्रपंची असमाधान ।। ६८ ।।

असावे व्यवहारी आपण । न फसावें इतकें लोकांकडून ।
प्रपंचीं नामाचें अधिष्ठान । निश्चयात्मकें असावें ।। ६९ ।।



पतीसेवा हा स्त्रीधर्म । प्रपंच कर्तव्य हें अपुलें कर्म ।
अंतरीं नित्य रामनाम । खोल मनीं ठसवावें ।। ७० ।।

अहंता टाकिल्याने प्रपंचातील । लाभ हानी झेलतां येईल ।
स्वभावें हरीस्मरण होईल । कृपा पीक ठरलेलें ।। ७१ ।।

कर्म करावें अलीप्त भावनेनें । कर्ता ' मी नव्हे ' जाणीवेने ।
राम कर्ता भाव विसरल्यानें । कर्मे बाधक होताती ।। ७२ ।।

जगताचा पालनकर्ता । कां न होईल अपुला पोषिता ? ।
निष्ठेंत अभिमान आड येता । कामा न ये कदापि ।। ७३ ।।

प्रपंचांतील अपुलेपण । भगवंताप्रती वळवून ।
निःस्वार्थ प्रेमें प्रपंच करून । नामस्मरणीं जगावें ।। ७४ ।।

' मी ' होणे उपाधिरहित । म्हणजेच असणें भगवंत ।
मायेच्या नसल्याने तावडीत । नामें बोध ब्रह्माचा ।। ७५ ।।

प्रपंचातील आसक्ती । कमी होण्यास्तव ईश्वरभक्ती ।
सदाचरणें भगवत्प्राप्ती । जनांचे भलें चिंतावें ।। ७६ ।।

सत्त्व गुणांत भगवंत । ऐसें व्हावें गुणवंत ।
या भाव अवस्थेत । सुटे काळजी प्रपंचाची ।। ७७ ।।

प्रपंच करावा सुखाने । भगवंताच्या अनुसंधाने ।
प्रपंच रामाचा म्हणण्याने । भगवंत कृपा होत असे ।। ७८ ।।



जैसें प्रेम मूल—मातेचें । तैसें असावें भगवंताचे ।
पाहणें सृष्टीप्रत कौतुकाचे । प्रपंचांत राहोनी ॥ ७९ ॥

भोगणें दुःख प्रापंचिक । खुणा मानावी अभिमान द्योतक ।
भगवंत कर्ता वृत्ती पोषक । नामें दुःख निवारण ॥ ८० ॥

हाव झाल्याविना कमी । कोण देईल परमार्थ हमी ।
नाम प्रेम सर्व कामी । परमार्थ रूप होईल ॥ ८१ ॥

राम असे मागे पुढे । देवा असे द्वार उघडे ।
मानसपुजा देवा आवडे । प्रपंच आसक्ती कमी होई ॥ ८२ ॥

संत संगती धरल्यानें । सत्‌विचार जोपासण्याने ।
अखंड नाम स्मरणानें । प्रपंची प्रेमप्राप्ती ॥ ८३ ॥

जोवरी असे प्रपंच आस । होणें अशक्य भगवंत दास ।
प्रपंची शाश्वत आनंदास । नामस्मरण जरूरीचे ॥ ८४ ॥

प्रपंच मिळे प्रारब्धाने । कर्तव्य कर्म म्हणून करणे ।
प्रपंची व्यापक होण्याने । समाधान प्राप्त होई ॥ ८५ ॥

विषय सुख इंद्रियाधीन । विकलेंद्रियें होती पराधीन ।
मग त्यांना खरें समाधान । प्रपंची कैसें ? ॥ ८६ ॥

सुख दुःख असे वासनेत । वासना नाश नामांत ।
निवासस्थान भगवंत । नामस्मरणे होत असे ॥ ८७ ॥

असावी भगवंताची स्मृती । कर्तव्याची असावी जागृती ।
एणे प्रकारे अपुली उन्नती । नामस्मरणे घडेल ॥ ८८ ॥



साक्षीत्वाने भगवंत असती । जनमात्र प्रपंचीं बुडती ।
अखंड नामस्मरण कृती । देई आनंद शाश्वत ॥ ८९ ॥
स्मरण करावे भगवंताचे । प्रपंची नाम त्याचे ।
संसार चाले इच्छे त्याचे । नामस्मरण महत्त्वाचे ॥ ९० ॥
'मी करतों' हा अभिमान । प्रपंची दुःखास कारण ।
'कर्ता मी नाही' समजोन । प्रपंची वागावे ॥ ९१ ॥
सत् संगती असे भाग्याची । उत्तम संगत सत्पुरुषाची ।
सर्वोत्तम संगत नामाची । स्मरण नामाचें असावें ॥ ९२ ॥
सत् संगें अस्तीत्व उरतें । अहंकार वारें न लागते ।
वासना क्षय होण्यातें । संत सहवास उत्तम ॥ ९३ ॥
जो चराचरी देव पाहे । तोच संत निश्चित आहे ।
संत होओनी संतां पाहे । उत्तम त्यास नाम मार्ग ॥ ९४ ॥
तोच खरा गुरु असे । राम शिष्यामाजी पाहतसे ।
शोधित शिष्या येतसे । नाममार्गे ॥ ९५ ॥
संत संगत परिणाम । म्हणजे 'सर्वत्र मी' जाण ।
भयाचे न उरे कारण । संत संगतींत ॥ ९६ ॥
भगवंत नामीं लोका लावणे । हे कार्य संतांचे जाणणें ।
सूर्यासम लोकोपकार करणें । काम असे संतांचें ॥ ९७ ॥
संत म्हणती देह अनित्य । तरी देह प्रेम नसे सुटत ।
भगवंत नामेंच शांती सत्य । प्रपंची रोहोनी ॥ ९८ ॥

भगवंताविन जें जें गोड । त्यास म्हणती विषय आवड ।
विषय येई दर्शना आड । नामें दूर तो होत असे ॥ ९९ ॥

संत असती साक्षीत्वाने । तैसेच अलीप्त असल्याने ।
सुख दुःख जाळ्यात नसल्यानें । भगवंत रूपे ते असती ॥१००॥

मन व्हावे राममय । कर्म व्हावे राममय ।
राम व्हावा ज्ञानमय । व्हावे अैसेची रामार्पण ॥ १०१ ॥

शिष्य जिज्ञासु असावा । विषयप्रेमी तो नसावा ।
संत सहवासे तो ज्ञानी व्हावा ॥ स्वस्वरूप दर्शने ॥ १०२ ॥

भगवंत प्राप्तीचा उपाय । सत् संगतीने सुलभ होय ।
नामा लावणे तिचे कार्य । भगवंताच्या ॥ १०३ ॥

संत वचनाचा अर्थ । ओढून ताणून न करावा व्यर्थ ।
समजण्या खरा परमार्थ । संतवचन आचरावे ॥ १०४ ॥

संत आज्ञा पालन । तीच सेवा असे जाण ।
तेणें खरा सत्समागम । जागृतीसाठी होत असे ॥ १०५ ॥

रहावें संतांचे होऊन । निर्लोभ व्हावे आंतून ।
प्राप्त होई अनुसंधान । भगवंताचे ॥ १०६ ॥

संत देहांत संत नसती । अपुल्या वचनांत ते असती ।
संत आज्ञा जे प्रमाण मानती । प्रचिती त्यांना येत असे ॥१०७॥

नामांत जाणीव भगवंतांची । नामे रामार्पण होण्याची ।
संधि परम भाग्याची । मिळे नामानुसंधाने ॥ १०८ ॥

नाम अपुले सर्वस्व व्हावे । नाम ध्यानें राम व्हावे ।
नामानंदी तृप्त व्हावे । नामानुसंधाने ॥ १०९ ॥

आनंद असे नामांत । बदल होतो वृत्तींत ।
मन होते मनातीत । अखंड नामस्मरणानें ॥ ११० ॥

मिळे संत सहवास । समजावे तें भाग्य खास ।
संत चरणीं विश्वास । असावा भगवंत मानोनी ॥ १११ ॥
संतां जावें शरण । तेणें भगवंत आठवण ।
तेणेंच समजे मी कोण । स्मरण नामाचे त्यासाठी ॥ ११२ ॥
सत्य स्वरूपाची ओळख । करून देती संत सुरेख ।
सत्समागम उपाय चोख । साधके आचरावा ॥ ११३ ॥
व्हावे लोकांचें कल्याण । यास्तव असे संताचरण ।
तसेंच त्यांचे ग्रंथलेखन । घडले लोकहितास्तव ॥ ११४ ॥
नाहींसें व्हावें हवेंपण । मग न उरे दुःखकारण ।
स्वभावें मिळे मुक्तपण । आसक्ती नष्ट झाल्यानें ॥ ११५ ॥
हृदय भरले विषयानें । रिक्त होई विषय गेल्यानें ।
हृदयीं प्रेम आल्यानें । चित्त होई भगवंत ॥ ११६ ॥
अनासक्ती असे ओज । उपासनेचें खरे बीज ।
उपासनेचें खरें तेज । भगवंत प्रेमांत सापडे ॥ ११७ ॥
प्रपंचामाजी परमार्थ । शिकविणारे ते समर्थ ।
वैराग्याचा खरा अर्थ । दासबोधांत सांपडे ॥ ११८ ॥
शब्द पांडित्य अनुभवाविना । निरर्थक बोल आचाराविना ।
'कर्ता मी नव्हे' भावना । सदैव असावी ॥ ११९ ॥
अर्थासक्ती कमी करणें । संत समागम उपाय जाणणें ।
त्यासाठी तळमळ असणें । सत् संगतीची ॥ १२० ॥
रामचरणीं व्हावें लीन । सहज गळे अभिमान ।
मग प्रपंच बंधनांतून । मुक्त होई साधक ॥ १२१ ॥
जेथें काम तेथें राम । काम व्हावे निष्काम ।
तेणें मिळे आराम । हेतु शुद्ध असल्याने ॥ १२२ ॥
परमार्थाचें कुंपण । हा संसार असे जाण ।
ओळखावे साध्य साधन । सावधपणें ॥ १२३ ॥
चित्तशुद्धी नामस्मरणें । 'अकर्ता मी' भाव होणें ।
माझा 'मी'पणा जाणें । नामस्मरणें शक्य होय ॥ १२४ ॥

गुरु देतात निवृत्ती । तेथे कैची विषय प्राप्ती ।
साधनेसाठी सत्संगती । तेणें निवृत्ती येत असे ॥ १२५ ॥
' मी ' गळणे खरोखरी । असे परमार्थ पायरी ।
भक्ती बीज तदनंतरी । उगवे शुद्ध चित्तांत ॥ १२६ ॥
स्वार्थ असे कायिक । स्वार्थ असे वाचिक ।
स्वार्थ असे मानसिक । दूर राहे भक्तीने ॥ १२७ ॥
राहणे सद्‌गुरुचे होऊन । तेणें जातो अभिमान ।
देहबुद्धी जाते गळून । भगवंतानुसंधाने ॥ १२८ ॥
ओळख पटावी माझी मला । ' तुला पहावें ' इच्छा मजला ।
प्रपंची समाधान प्राप्तीला । नामानुसंधान असावें ॥ १२९ ॥
नको गुंतणें विषयांत । नको गुंतणे प्रेमांत ।
नको नको मत्सरांत । नाम प्रेमांत गुंतावे ॥ १३० ॥
न करावे उपास तापास । उपासनेवर असावा विश्वास ।
तेणें समाधान मिळे खास । घ्यावा प्रत्यय नामाचा ॥१३१॥
ज्ञान आणावें कृतींत । मन व्हावें विशाल शान्त ।
स्वार्थ नसावा मनांत । मर्म असे वेदान्ताचें ॥ १३२ ॥
स्वार्थानें द्वेष घडे । द्वेषानें हिंसा घडे ।
हें न होण्या साधन रोकडें । नामस्मरणाचें ॥ १३३ ॥
हृदयीं ठेवावें रामनाम । मग कृपा करी आत्माराम ।
सत्संगतीचा परिणाम । राम कृपेंत होत असे ॥ १३४ ॥
ब्रह्म चैतन्य गोंदवलेकर । त्यांच्या निरूपणाचे हें सार ।
ओवी रूपांत निर्मिला हार । अर्पिण्या श्री रामराया ॥१३५॥
ब्रह्म चैतन्य कृपा करिती । ओवीसार लिहिण्या मति देती ।
सद्‌गुरु प्रभुस मिळे स्फूर्ती । देण्या भाविकां नामामृत ॥१३६॥

[ इति श्रीराम प्रेरणया आजगांवकर इत्युपनामक सद्‌गुरु प्रभु विरचित ' ओवी नामामृत सार ' ओवी संख्य १३६ ]

# आमचे संग्राह्य ग्रंथ

(१) **भारतातील शास्त्रांचा उद्गम आणि विकास**
लेखक : डॉ. पंढरीनाथ प्रभु, पृष्ठे १६ + ३०४
खास सवलतीची कि. ४१, ट. ख. ५ रु.

(२) गंधर्वकालीन मराठी रंगभूमीचे आधारस्तंभ
**नटवर्य माधवराव वालावलकर**, पृष्ठे १५० + १८
संपादन – गुं. फ. आजगांवकर, कि. २५, ट. ख. ५ रु.

(३) **प्राचीन मराठी संतकवी**, खंड २ रा व ३ रा, पृष्ठे १०००
लेखक : महाराष्ट्र भाषाभूषण ज. र. आजगांवकर कि. ६०

(४) कोकण रेल्वेकर्ते : अ. र. वालावलकर ( चरित्र आणि लेख )
संपादन गुं. फ. आजगांवकर पृष्ठे ३००, कि. २० रु.

(५) प्रसिद्ध पुरुषांच्या अप्रसिद्ध गोष्टी. कि. २० रु.
ले. ज. र. आजगांवकर, संपादन : गुं. फ. आजगांवकर पृष्ठे २९०

(६) **वालावल दर्शन**, पृष्ठे ९०, ले. : गुं. फ. आजगांवकर कि. ५ रु.

(७) आजगांव दर्शन पृष्ठे १००, ले. : गुं. फ. आजगांवकर कि. १० रु.

(८) **सेनापति भोसले**, ( इंग्रजी ) ५ रु., पृष्ठे १००

(९) **सोऽहं ध्यान तरंग**, कि. २ रु. ( शिव प्रार्थनेसाठी )

## लिहा : ( १ ) प्रबोधन रिसर्च असोशिएट्स्

गिरगाव, १७, के. सी. बी. निवास, मुंबई–४०० ००४

## ( २ ) तुकाराम बुक डेपो

माधवबाग, मुंबई–४०० ००४

कोंकणच्या नावलौकिकात भर घालणारे

वालावल गांवचे सुपुत्र —

# कै. श्री. दत्तात्रय विश्राम प्रभू वालावलकर

यांनी स्थापन केलेली —

# संदीप मेटल इंडस्ट्रीज

मुंबईतील अग्रगण्य

## ॲल्युमिनियम भांड्यांचे उत्पादक

[illegible], ११ स्टोर नं. [illegible], क्रॉस रोड-बी, एम्. आय. डी. सी.,

अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०९३

फोन : ६३२ २२ ४० - ६३२ ६३ ८०

---

टेलिफोन : ३७१४२६ - ३७१३४०

३७६८७२ - ३७८११४

# युनिक् ब्लॉक्स्

# युनिक् फोटो ऑफ्सेट्

# सर्व्हिसेस्

१३०, १११,१३२, अशोक इंडस्ट्रीयल इस्टेट,

लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३